<u>अपात्र शिधापत्रिका शोध मोहिम राबविणेबाबत..</u>

महाराष्ट्र शासन
अन्न नागरी पुरवठा व आणि ग्राहक संरक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र: संकिर्ण -२०१३/प्र. क्र. ३७७/नापु २८
मंत्रालय मुंबई-४०००३२
दिनांक: १३ जुन, २०१९

<u>वाचा:-</u>

१) शासन परिपत्रक क्र.२००९/२०४८/प्र. क्र.३३२/नापु २८ दिनांक:११ सप्टेंबर,२००९
२) शासन परिपत्रक क्र.शिवाप -१४११/प्र. क्र. २५/ नापु २८ दिनांक: ११ फेब्रुवारी,२०११

<u>शासन परिपत्रक</u>

केंद्र शासनाकडून यापुर्वी प्राप्त झालेल्या निर्देशानुसार अपात्र शिधापत्रिकांचा शोध घेऊन अशा शिधापत्रिका रद्द करण्याच्या सूचना उपरोक्त क्र. १ व २ येथील शासन परिपत्रकान्वये सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. आता लेखा परिक्षण वर्ष २०१२-२०१३ संबंधात लोकलेखा समितीकडून प्राप्त झालेल्या शिफारशीमध्ये अपात्र शिधापत्रिकांचे नियमित पुनर्विलोकन करणे बंधनकारक असताना ते न झाल्यामुळे अथवा सदोष राहिल्यामुळे अपात्र कुटुंबियांना देखील लाभ मिळत आहे. तसेच या योजनेंतर्गत पात्र ठरविण्यासाठी निश्चित केलेल्या निकषांतर्गत अंत्योदय, बी.पी.एल व प्राधान्य कुटुंब घटक म्हणून अर्जदाराने सादर केलेल्या माहितीची योग्य छाननी व शहानिशा व खात्री करुनच शिधापत्रिकांधारकाची पात्रता व अपात्रता अंतीम करण्यात यावी व त्यासाठी दुचाकी/चारचाकी व जमीनीची मालकी इ. बाबत प्रादेशिक परिवहन विभाग व महसूल विभागांशी योग्य तो समन्वय ठेवून शिधापत्रिका धारकांच्या कागदपत्रांची छाननी व तपासणी करावी, त्यानंतरच शिधापत्रिका जारी अथवा रद्द करणेबाबतची शिफारस लोक लेखा समितीने सन २०१२-१३ च्या अहवालामध्ये केली आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

२. शोध मोहिमेअंतर्गत दिनांक ११.०९.२००९ व दिनांक ११.०२.२०११ च्या शासन परिपत्रकान्वये त्यामध्ये परिच्छेद क्र. ब येथे देण्यात आलेल्या सूचना व्यतिरीक्त पुढील सूचना समाविष्ट करण्यात येत आहेत.

१) दुचाकी/चारचाकी वाहनांबाबत प्रादेशिक परिवहन विभागाशी समन्वय ठेवून कागदपत्रांची छाननी करावी.
२) जमीनीच्या मालकीबाबत महसूल विभागाशी समन्वय ठेवून शिधापत्रिका धारकांच्या कागदपत्रांची छाननी करावी.

शिधापत्रिकांचे पुनर्विलोकन प्रत्येक महिन्याला सादर करावे, तसेच त्याचा सहामाही व वार्षिक अहवाल जुलै व जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शासनास सादर करावा.

३.   सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०६१३१३११२८५३०६ असा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANSARI HAMID HUSAIN
GHULAM HUSAIN

Digitally signed by ANSARI HAMID HUSAIN GHULAM HUSAIN
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=69dd46d3e945331718a310b32442b455be9e6345625515da42b3561e4c604e1c, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=222e51744f0136a9a645bdd866387dedb6dc52db458ac5087cb2226e1a239f61, ou=FOOD AND CIVIL SUPPLY DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ANSARI HAMID HUSAIN GHULAM HUSAIN
Date: 2019.06.13 17:08:28 +05'30'

(हामिद अन्सारी)
अवर सचिव
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत,

१. प्रधान सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
४. सर्व मंत्रालयीन विभाग/ मा.मुख्य सचिव यांचे कार्यालय
५. सर्व विभागीय आयुक्त
६. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सर्व महानगरपालिका आयुक्त,
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
१०. सर्व पोलीस आयुक्त
११. सर्व पोलीस अधिक्षक
१२. सर्व उपायुक्त (पुरवठा)
१३. सर्व अपर जिल्हाधिकारी
१४. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
१५. अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे/सोलापूर/नागपूर
१६. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१७. मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
१८. मा.राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
१९. सर्व उप सचिव/अवर सचिव/सर्व कार्यासने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
२०. निवड नस्ती (नापु-२८)